सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ४२ | गुरुवार, दि. ६ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
६ नोव्हेंबर

- महात्मा गांधींनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लंडनमध्ये प्रवेश घेतला.
- भारत या वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला.
- या दिवशी मुंबई राज्यात बॉम्बे इलेक्ट्रिसिटी बोर्डाची स्थापना झाली.
- भारतीय शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना विकसनशील देशांना जैवतंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याच्या कार्यासाठी युनेस्को गांधी सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले.
- संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (DRDO) महासंचालक डॉ. वासुदेव अत्रे यांना प्रतिष्ठित वाय. नायडुम्मा मेमोरियल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- म्यानमारच्या लष्करी राजवटीने आपली राजधानी रंगूनहून पायनमाना येथे हलवली.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

**माणूस मेल्यानंतर त्याच्या आठवणींचे पुढे काय होते? विज्ञान काय सांगते** ...पान २ वर

**बोरी नदीवरील साडेसात कोटींचा पूल वापराविनाच!**

**‘व्हॉईस ऑफ मीडिया’तर्फे आंतरराष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर** ...पान ३ वर

**आपल्या गोत्राची खरी शक्ती माहिती आहे का?** ...पान ४ वर

















# श्री मंगळ ग्रह मंदिरात श्री तुळशी विवाह सोहळा विधिवत मंगलमय वातावरणात साजरा!

## सर्व प्रकारच्या वायफळ खर्च टाळुन सनातन व साध्या पद्धतीने संस्कृतीबद्ध झाला कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– भारतीय संस्कृतीत श्री तुळशी विवाहाला अनन्यसाधारण महत्व आहे. श्री तुळशीच्या विवाहानंतर वधू– वरांच्या ब्रम्हगाठी विवाह सोहळ्यांच्या रुपाने बांधल्या जातात. ही परंपरा कायमस्वरुपी टिकून राहावी, श्री मंगळ ग्रह मंदिरात येणाऱ्या विवाहेच्छुकांच्या इच्छापूर्तीसाठी परमेश्वराची विशेष आराधना करावी, या उद्देशातुन मंगळ ग्रह सेवा संस्थेने अतिशय शुभ व परम् पवित्र अशा मंगलदिनी अर्थात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त श्री तुळशी विवाह सोहळ्याची परंपरा सुरु केली आहे. यंदाचे हे १४वे वर्ष आहे. बुधवार, दि. ५ रोजी सायंकाळी ७ वाजून २२ मिनिटे या शुभ मुहुर्तावर अतिशय चैतन्यमयी व मंगलमय वातावरणात शास्त्रोक्त पद्धतीने विवाह सोहळा पार पडला. सर्व प्रकारच्या खर्चिक तामझामला फाटा देऊन सनातन व साध्या पद्धतीने संस्कृतीबद्ध कार्यक्रम झाला.

दरम्यान, सकाळी आठ ते साडेआठ दरम्यान वाग्दान अर्थात वरराजा व वधूराणी यांचे यजमान अनिल मराठे व मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील यांच्या हस्ते पूजन झाले. साडेआठ ते नऊ दरम्यान हळदीचा कार्यक्रम झाला. अमळनेर शहरातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. राजेंद्र भगवान ठाकरे व दंत चिकित्सक डॉ. श्वेता राजेंद्र ठाकरे पुजेचे मानकरी होते. यावेळी त्यांनी मधुपर्क पुजनही केले. साडेनऊ ते ११ दरम्यान कन्यादान व लाजा होम झाला. त्यासाठी नवविवाहीत नितीन सदाशिव पाटील (नंदगाव, ता. अमळनेर) हे सपत्निक यजमान होते. सायंकाळी पाच वाजता वराच्या वेषातील भगवान श्रीकृष्ण यांच्या मूर्तीची सजविलेल्या रथात व श्री मंगळ ग्रह देवाची उत्सव मूर्ती असलेल्या पालखीची मंदिर परिसरात वाजत– गाजत मिरवणूक काढण्यात आली. त्यात स्त्री– पुरुष भाविकांनी जल्लोषपूर्ण नृत्याचा आनंद घेतला. या सोहळ्याचे यजमान मनोज पाटील (कलाली, ता. अमळनेर) यांनी सपत्निक पालखी पूजन, हरिहर भेटीचे पूजन व मंगल आरती केली. या शाही स्वरुपाच्या विवाह सोहळ्यात वर– वधूच्या मामांची भूमिका माजी नगरसेवक तथा मंगल सेवेकरी बाळा पवार व मनोहर दीक्षित यांनी निभावली. ज्येष्ठ पुरोहित केशव पुराणिक व कर्मब्रह्मा परशुरामजी शर्मा यांनी मुख्य पौरोहित्य केले. त्यांनी विधी अर्थात मंगलाष्टक म्हटले. त्यांना मंदिराचे पुरोहित प्रसाद भंडारी, शुभम वैष्णव, तुषार दीक्षित, जयेंद्र वैद्य, गणेश जोशी, मंदार कुळकर्णी, वैभव लोकाक्षी, हेमंत गोसावी, विनोद पाठक, सारंग पाठक, सुनील मांडे, यश जोशी, गोपाळ पाठक, चेतन नाईक, प्रवीण भंडारी यांच्यासह भक्त परिवाराने सहकार्य केले.

सोहळा यशस्वितेसाठी मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुळकर्णी, विश्वस्त अनिल अहिरराव, श्रीमती जयश्री साबे, डी. ए. सोनवणे, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, विनोद कदम, जी. एस. चौधरी, एम. जी. पाटील, आशिष चौधरी, आर. टी. पाटील, व्ही. व्ही. कुळकर्णी, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. आर. जी. चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

याप्रसंगी मंगळग्रह मंदिरातील सेवेकरी व वऱ्हाडींच्या रुपाने आलेले शहर व तालुक्यातील विविध क्षेत्रातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चाली, रुढी व परंपरांचे जतन

दरवर्षी मंगळग्रह सेवा संस्था खूप भव्य प्रमाणात श्री तुळशी विवाह महासोहळा साजरा करीत होती. मात्र, यावर्षी १० जून रोजी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सर्वांनी विवाह सोहळे पारंपरिक हिंदु संस्कृतीप्रमाणे कमी खर्चात साजरे करावेत यासह अनेक समाजाभिमुख बाबींच्या शपथ देण्यात आल्या. तेव्हापासून अभिषेकासाठी येणाऱ्या प्रत्येकाला ही शपथ दिली जाते. त्यामुळे मंगळग्रह सेवा संस्थेनेही तुळशी विवाह महासोहळा साधेपणाने मात्र पूर्णतः सनातन हिंदु धर्माच्या चाली, रुढी व परंपरेप्रमाणे साजरा केला.

# वाङ्मय मंडळाच्या निवडणुकीनंतर मनांची ऐक्ययात्रा

## “विरोध विसरून, विचार जोडले वाङ्मयासाठी हातात हात घातले!”

**मंगळ ग्रह सेवा संस्थेचा विधायक उपक्रम**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी वाङ्मय मंडळाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत, अत्यल्प सभासद असूनही, यंदा चुरस आणि उत्सुकता दोन्हीही तुफान होती. मतदारांनी लोकशाहीचा उत्सव साजरा करत आपापल्या आवडत्या उमेदवारांना पाठिंबा दिला. मात्र, निकालानंतर घडलेले दृश्य हे शहराच्या वाङ्मयीन इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहावे असेच ठरले.

विजयानंतरच्या दुसऱ्याच दिवशी मंगळ ग्रह सेवा संस्थेने दोन्ही पॅनलच्या सर्व उमेदवारांना महाआरती व सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने एकत्र बोलावले. तेथे ना कटुता होती, ना पराभवाची वेदना होती फक्त एकच भावना, “आता आपण सर्व एक आहोत.”
या सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, विरोधी पॅनलचे अध्यक्षपदासाठी पराभूत झालेले श्री. शरद सोनवणे यांनी स्वतः सर्व विजयी उमेदवारांचा सन्मानपूर्वक सत्कार केला. त्यांचा हा मोठेपणाचा भाव उपस्थितांवर खोल प्रभाव पाडणारा ठरला.






डॉ. अविनाश जोशी (अध्यक्षपदाचे विजेते), संदीप घोरपडे सर, बन्सीलाल भागवत गुरुजी, आणि सौ. वसुंधरा लांडगे यांनी मनोगतातून एकतेचा आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचा संदेश दिला. सर्वांनी मिळून संस्थेचे ७५ वे अमृतमहोत्सवी वर्ष भव्य, भावपूर्ण आणि शहराच्या अभिमानाचे प्रतीक ठरेल, असा निर्धार केला.

संपूर्ण वाङ्मयीन कुटुंबाला एकत्र आणण्याचे श्रेय मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांना जाते. त्यांच्या समंजस नेतृत्वाने आणि संयमी दृष्टिकोनाने प्रतिस्पर्धी गट एकत्र आले आणि “विचारांची मैत्री” ही नवी परंपरा रुजली.
याप्रसंगी मंगळ ग्रह सेवा संस्थेचे विश्वस्त, मान्यवर आणि सर्व उमेदवार उपस्थित होते. सोहळ्याचे वातावरण मंगलमय झाले. जणू मतभेदांचे ढग दूर होऊन साहित्य आणि संस्कृतीचा सूर्य पुन्हा एकदा उजाडला! हा सोहळा म्हणजे निवडणुकीतील जय– विजयाच्या पलिकडे जाऊन मनांच्या विजयाचा उत्सव ठरला. सत्कारा पूर्वी सर्वांनी पालखी पूजन व महाआरती केली



# माणूस मेल्यानंतर त्याच्या आठवणींचे पुढे काय होते? विज्ञान काय सांगते

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जग सोडून गेले आहेत, त्यांचे काय? त्यांच्या आठवणींचे नेमके काय होते? त्या मृत व्यक्तीच्या विचारांना, अनुभवांना आणि आयुष्यातील क्षणांना पुन्हा प्राप्त करता येत का? याचाच शोध संशोधकांनी घेतला आहे.

मानवी आयुष्य हे अनेकदा संघर्षमय असते. वाटेतील प्रत्येक वळणार हृदयात घर करणारी माणसे भेटतात. त्याचप्रमाणे दुखावणारी माणसेही असतात. या ऊन- पावसाच्या खेळात जो शेवटपर्यंत साथ देतो, ज्याच्या सहवासात आपण खुलतो, हळवे होतो, कधी चिडतो, रागावतो... ती व्यक्ती प्रत्यक्ष समोर नसली तरी तीच असणे हाच आपल्यासाठी आधार असतो. त्यामुळेच तीच जाण कदाचित एखाद्या आघाताप्रमाणे असते आणि मागे राहतात त्या केवळ आठवणी.

या आठवणी कधी वस्तूच्या रूपाने जपल्या जातात, तर कधी अश्रूंच्या माध्यमातून. जे मागे राहिले आहेत त्यांना किमान त्यांच्या स्मृतीचा आधार असतो. परंतु जे जग सोडून गेले आहेत त्यांचे काय? त्यांच्या आठवणींचे नेमके काय होते? त्या मृत व्यक्तीच्या विचारांना, अनुभवांना आणि आयुष्यातील क्षणांना पुन्हा प्राप्त करता येते का? याचाच शोध संशोधकांनी घेतला आहे. काही आठवणी मृत्यूनंतरही जतन करता येतात, असे मत संशोधक व्यक्त करतात. परंतु ही प्रक्रिया जटिल आहे. त्यात काही महत्त्वाचे टप्पे पार पाडावे लागतात.

स्मरणशक्तीचे शास्त्र स्मृती निर्माण होणे ही मानवी मेंदूतील सर्वांत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियामधील मेंदूतज्ज्ञांनी एका मुलाखतीत स्पष्ट केले, की न्यूरॉन्सच्या समूहांद्वारे आठवणी कोड केल्या जातात. हे न्यूरॉन्स म्हणजे अशा पेशी असतात, की ज्या एखादा अनुभव घेताना किंवा एखादी गोष्ट, प्रसंग आठवत असताना सक्रिय होतात. विशेषतः अल्पकालीन आणि दीर्घकालीन आठवणी हिप्पोकॅम्पसमध्ये निर्माण होतात, तर इतर संवेदनाक्षम तपशील पॅरिएटल



लोब आणि सेन्सरी कॉर्टेक्ससारख्या विविध भागांमध्ये संग्रहित होतात. जेव्हा न्यूरॉन्स एकत्र कार्यरत होतात, तेव्हा ते एंग्राम नावाचा भौतिक ठसा तयार करतात, जो आठवणींचा जैविक साक्षीदार म्हणून काम करतो. या संकल्पनेचा प्राण्यांच्या अभ्यासामध्ये मोठ्या प्रमाणावर शोध घेण्यात आला आहे. संशोधकांनी उंदरांच्या मेंदूतील एंग्रामची यशस्वीरित्या ओळख पटवली आहे. उदा.- २०१२ मध्ये ‘ नेचर ’ मध्ये प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधात भीतीशी संबंधित मेंदूच्या विशिष्ट पेशी ओळखण्यात आल्या होत्या. मात्र, मेंदूतज्ज्ञांच्या मते मानवी मेंदूच्या अत्यंत गुंतागुंतीच्या संरचनेमुळे माणसांमध्ये अशा आठवणींचे ठसे ओळखणे खूप कठीण आहे.

### आठवणी पुन्हा मिळविण्यातील अडथळे

मृत व्यक्तीच्या मेंदूतून आठवणी परत मिळविण्यासाठी शास्त्रज्ञांना सर्वप्रथम त्या आठवणींशी संबंधित विशिष्ट न्यूरॉन्सचा समूह शोधावा लागेल. यासाठी मेंदूमधील न्यूरॉन्सच्या गुंतागुंतीच्या जाळ्याचा सखोल अभ्यास करावा लागेल. कारण न्यूरॉन्स मेंदूच्या वेगवेगळ्या भागांमध्ये पसरलेले असू शकतात. आठवणी स्थिर नसल्यामुळे ही प्रक्रिया आणखी कठीण होते. आठवणी काळानुसार विकसित होतात आणि त्या मेंदूच्या वेगवेगळ्या भागांमध्ये फिरत राहतात, असे मत मेंदूतज्ज्ञ व्यक्त करतात. प्रारंभी जे न्यूरॉन्स एखाद्या अनुभवाच्या वेळी सक्रिय झालेले असतात, ते एक एंग्राम तयार करतात, असे अरनॉल्ड यांनी स्पष्ट केले आहे. परंतु, कालांतराने मेंदूमध्ये आठवणी स्थिर होत असताना त्या वेगवेगळ्या ठिकाणी पसरल्याचे पुरावे मिळाले आहेत. म्हणजेच, आठवणी एका ठिकाणी कायमस्वरूपी साठवलेल्या नसतात तर त्या प्रवाही असतात, त्यामुळे त्यांना परत मिळविणे अधिक कठीण ठरते.

### एक दूरची स्वप्नपूर्ती

सध्या मेंदूचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांकडे मानवी मेंदूचा संपूर्ण नकाशा नाही. त्यामुळे एखाद्या विशिष्ट आठवणीचे अचूक स्थान ओळखणे अशक्य आहे. पण हे त्यांना जमले, तरीही आठवणी परत मिळविणे संगणकावरून एखादी फाईल उघडण्याइतके सोपे नाही. एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे, की आठवणी भूतकाळातील घटनांचे परिपूर्ण चित्रण नसतात. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया डेव्हिसमधील मेमरी अ‍ॅण्ड प्लास्टीसिटी कार्यक्रमाचे संचालक सांगतात, की स्मरणशक्ती ही मुळात पुनर्रचनात्मक असते. आठवणी या पुनर्रचनात्मक असतात. म्हणजे तुम्ही एखाद्या घटनेचे काही तुकडे आठवू शकता, पण संपूर्ण अनुभव जसाच्या तसा मिळत नाही.

याचा अर्थ असा, की शास्त्रज्ञांना जरी एखाद्या आठवणीशी संबंधित न्यूरॉन्स सापडले, तरीही त्या घटनेचा नेमका अनुभव जसाच्या तसा पुनर्रचित करता येणार नाही. उदा.- एखाद्या वाढदिवसाच्या पार्टीची आठवण घ्या. एखाद्या व्यक्तीला चॉकलेट केक खाल्ल्याचे आणि पकडापकडी खेळल्याचे आठवेल. पण सर्व पाहुणे कोण होते किंवा त्या दिवशी पाऊस पडला होता का, याची स्पष्ट आठवण असण्याची शक्यता कमी आहे. मेंदू अशा विसरलेल्या गोष्टी भरून काढतो आणि आधीच्या ज्ञानाच्या आधारे त्या घटनेचा एक छाप तयार करतो, पण संपूर्ण व अचूक अनुभव मात्र टिकून राहत नाही.

स्मरणशक्तीसी संबंधित संशोधनाचे भविष्य तंत्रज्ञानात मोठी प्रगती झाली असली, तरी मृत व्यक्तीच्या मेंदूतून आठवणी परत मिळवू शकणारे मशीन लर्निंग मॉडेल तयार करणे अजूनही खूप दूरची गोष्ट आहे. एखादी प्रणाली विकसित करायची असेल तर त्या व्यक्तीचा मेंदू आयुष्यभरात वेळोवेळी स्कॅन करावा लागेल. जेणेकरून आठवणींची नोंद राहील आणि त्यावरून स्मरणशक्तीची अचूक रचना उभी करता येईल. मात्र ही कल्पना अशा गृहितकावर आधारलेली आहे, की आठवणी या जणू संगणकाच्या हार्ड ड्राइव्हवर जतन केलेल्या स्थिर फाईलींसारख्या असतात. पण आता या गृहितकावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कारण माणूस आपल्या आठवणींना अनेकदा वेगवेगळे अर्थ आणि दृष्टिकोन देतो आणि त्या प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे अचूक प्रतिबिंब असतीलच असे नाही.

सध्या तरी एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यभराच्या आठवणी त्याच्यासोबतच कायमस्वरूपी बंद राहतात आणि त्याच्या निधनानंतर त्या नष्ट होतात. आठवणी परत मिळविण्याची कल्पना रोमहर्षक असली तरी मेंदूशास्त्राच्या दृष्टीने ती अद्याप खूप दूर आहे. आत्तापुरते, एखाद्या प्रिय व्यक्तीच्या आठवणी जपण्याचा खरा मार्ग म्हणजे त्यांनी मागे ठेवलेल्या कथा, छायाचित्रे आणि त्यांचा वारसा आहे.

# गेल्या दहा वर्षांत धोनीसोबत बोलणेच नाही

## हरभजन सिंहने व्यक्त केल्या कटू भावना

**ग्लोबल महातजे वृत्तसेवा**

भारतीय क्रिकेटमध्ये हरभजन सिंह आणि एम.एस. धोनी यांच्या जोडगोळीने अनेक ऐतिहासिक कामगिरी केल्या आहेत. २००७ चा टी-२० विश्वचषक, २०११ चा वन डे विश्वचषक आणि चेन्नई सुपर किंग्जसाठी मिळविलेली आयपीएल विजेतेपदे त्यांच्या सहकार्याची साक्ष देतात. मात्र, गेल्या काही वर्षांपासून या दोघांच्या वैयक्तिक नात्यात दुरावा आल्याचे स्पष्ट होत आहे. हरभजन सिंहने अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत सांगितले, की त्याने धोनीशी तब्बल दहा वर्षांपासून कोणताही संवाद साधलेला नाही.

### मैत्रीतील ताण : हरभजनचा धक्कादायक खुलासा

मुलाखतीत हरभजन सिंहने धोनीसोबतच्या संवादाबाबत भाष्य केले. त्यांनी कबूल केले, की त्यांचे धोनीसोबतचे शेवटचे बोलणे चेन्नई सुपर किंग्जसाठी खेळत असताना झाले होते. त्यावेळीही त्यांचे संवाद फक्त क्रिकेटपुरते मर्यादित होते.

“ नाही, मी धोनीशी बोलत नाही. जेव्हा मी सीएसकेसाठी खेळत होतो तेव्हा आमचे थोडेफार बोलणे व्हायचे. मात्र त्यानंतर अजिबात नाही. त्याला काही कारणे असतील. ती मला माहीत नाहीत. आयपीएलदरम्यानही आमचे बोलणे फक्त मैदानापुरते मर्यादित होते. त्याने कधीही माझ्या रूममध्ये यायचा प्रयत्न केला नाही. मीही त्याच्या रूममध्ये गेलो नाही,” असे हरभजन सिंहने सांगितले.

शेवटचा सामना आणि नंतरचे अंतर हरभजन आणि धोनी यांनी एकत्र भारतासाठी शेवटचा सामना २०१५ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला होता. यानंतर २०१८ मध्ये दोघे पुन्हा एकत्र सीएसकेकडून खेळले. मात्र मैदानाबाहेर त्यांच्या नात्यात संवादाचा अभाव स्पष्ट दिसला. हरभजनने नमूद केले, की या दुराव्यामागे कोणताही कटुतेचा भाग नाही. परस्पर संवादासाठी प्रयत्न मात्र झालेले नाहीत.

“ माझ्याकडे त्याच्याविरोधात काहीही नाही. त्याला काही सांगायचे असेल, तर त्याने सांगावे. मी त्याला फोन का केला नाही? कारण मला वाटते, की फोन करण्यासाठी दोघांच्या बाजूनेही समान उत्साह असावा लागतो,” असेही हरभजन सिंहने स्पष्ट केले.




### गोल्डन एरा आठवणींचा ठेवा

धोनीच्या नेतृत्वाखाली हरभजनने भारतीय संघासाठी मोलाची भूमिका बजावली होती. २००७ च्या टी-२० विश्वचषकात हरभजनने ७ विकेट घेतल्या, तर २०११ च्या विश्वचषकात त्याने ९ विकेट मिळवत भारताच्या विजयात मोठे योगदान दिले. धोनीचा संयमी नेतृत्वशैली आणि हरभजनची प्रभावी गोलंदाजी यांनी भारतीय क्रिकेटसाठी सुवर्णकाळ घडविला.

### सध्याची परिस्थिती

२०१५ च्या विश्वचषकानंतर हरभजन सिंहला आणि युवराज सिंहला संघातून वगळण्यात आले. २०२१ मध्ये हरभजनने क्रिकेटमधून निवृत्ती घेतली, तर धोनी आजही आयपीएल खेळत असून २०२५ मधील पुढील सीझनची तयारी करत आहे.

# ट्रेन तिकीट बुक करताय?

## मग आधी ‘ हे ’ एक काम करा, मिळेल कन्फर्म तिकीट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जर तुम्हाला कन्फर्म ट्रेन तिकीट हवे असेल, तर त्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. फक्त एका सोप्या कामाने तुम्ही बुकिंग प्रक्रिया वेगवान करू शकता. ज्यामुळे कन्फर्म तिकीट मिळण्याची शक्यता वाढते. विशेषतः तत्काळ बुकिंगसाठी हे उपयुक्त आहे.




### तत्काळ ट्रेन तिकीट बुकिंगसाठी सर्वोत्तम ट्रिक्स

अनेक लोक प्रवासासाठी रेल्वेची निवड करतात. कारण ती परवडणारी आणि आरामदायी आहे. ट्रेन तिकीट ऑनलाइन बुक करण्यासाठी अधिकृत आयआरसीटीसी अ‍ॅप किंवा वेबसाइटचा वापर करा. मात्र कन्फर्म तिकीट मिळविण्यासाठी आधीच तयारी करा. यासाठी ‘ मास्टर लिस्ट ’ तयार करणे हा सोपा उपाय आहे. ही लिस्ट तयार केल्याने प्रवाशांचे तपशील (नाव, वय, लिंग इत्यादी.) आधीच सेव्ह होतात. ज्यामुळे बुकिंगदरम्यान वेळ वाचतो आणि तत्काळसारख्या वेगवान प्रक्रियेत फायदा होतो.

### करा हे सोपे काम

कन्फर्म तिकीट हवे असेल, तर ते लवकर बुक करा. मास्टर लिस्ट तयार केल्याने प्रवाशांचे तपशील मॅन्युअल एंटर करण्याची गरज नसते; तुम्ही ड्रॉपडाउनमधून निवडू शकता. यामुळे १०-२० सेकंद वाचतात, जे तत्काळसाठी महत्त्वाचे आहे. (टीप : तत्काळ एसी क्लाससाठी मास्टर लिस्टचा वापर करता येतो, पण नॉन-एसीसाठी मर्यादा असू शकतात.)

**स्टेप १ :** आयआरसीटीसीच्या अधिकृत वेबसाइट (https://www.irctc.co.in/nget/train-search) किंवा अ‍ॅपवर जा. ‘ लॉगिन ’वर क्लिक करून तुमच्या खात्यात लॉगिन करा. (**आधी आधार व्हेरिफिकेशन पूर्ण करा :** माय अकाउंट > ऑथेंटिकेट यूजर > आधार नंबर एंटर करा आणि ओटीपी व्हेरिफाय करा.)

**स्टेप २ :** ‘ माय अकाउंट ’ विभागात जा > ‘ माय प्रोफाइल ’ > ‘ अ‍ॅड/मॉडिफाय मास्टर लिस्ट ’वर क्लिक करा. येथे प्रवाशाचे नाव (आधारप्रमाणे), जन्मतारीख, लिंग, बर्थ प्रेफरन्स, आयडी प्रूफ टाइप (आधार अनिवार्य), आधार क्रमांक इत्यादी तपशील भरा. सबमिट करा. आधार व्हेरिफिकेशनसाठी ओटीपी येईल; ते एंटर करा. काही मिनिटांत तपशील सेव्ह होतात आणि ‘ व्हेरिफाइड ’ स्टेटस दिसेल.

### तिकीट बुकिंगदरम्यान

‘ पॅसेंजर डिटेल्स ’ सेक्शनमध्ये ड्रॉपडाउनमधून सेव्ह केलेले नाव निवडा. उरलेले तपशील ऑटो-फिल होतात. पेमेंटसाठी आयआरसीटीसी वॉलेट, यूपीआय किंवा क्यूआर कोडचा वापर करा. त्यामुळे अतिरिक्त वेळ वाचतो.

### इतर टिप्स तत्काळसाठी

- बुकिंग विन्डो उघडण्यापूर्वी (सकाळी १० वाजता एसीसाठी, ११ वाजता नॉन-एसीसाठी) ५ मिनिटे आधी लॉगिन राहा.
- डेस्कटॉप वापरा; अ‍ॅपपेक्षा वेगवान.
- क्रोम/एज ब्राउजरमध्ये ऑटोफिल सेट करा.
- अधिकृत साइट/अ‍ॅप वापरा; थर्ड-पार्टी अ‍ॅप्स टाळा.

या ट्रिक्सने तुम्हाला कन्फर्म तिकीट मिळण्याची शक्यता नक्की वाढेल. **(टीप : १ जुलै २०२५ पासून तत्काकाळ बुकिंगसाठी आधार व्हेरिफिकेशन अनिवार्य आहे. त्यामुळे मास्टर लिस्ट आधाराशी लिंक करणे आवश्यक आहे.)**

# एका मुलीसाठी धावली रेल्वे!




जपानमध्ये कामी-शिराताकी नावाचे एक रेल्वे स्टेशन आहे. हे रेल्वे स्टेशन जवळ-जवळ बंदच आहे, असे म्हणू शकतो. कारण ही जागा जपानमध्ये खूप दूरच्या भागात असल्याने येथे ये-जा करणारे प्रवासी तसे कमीच. त्यामुळे जपान रेल्वेज या संपूर्ण रेल्वे लाईनला बंद करणार होती. पण तेवढ्यात त्यांना समजले, की कानाहाराडा ’ नावाची एक लहान मुलगी या ट्रेनचा वापर रोज शाळेत जाण्यासाठी करते. साहजिक आपल्याला एका प्रवाशामुळे काही फरक पडणार नाही. पण रेल्वे लाईन बंद झाल्याने मुलीची शाळा बंद पडेल हे जेव्हा जपान रेल्वेजच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी जो निर्णय घेतला तो कौतुक करण्याजोगा होता. त्यांनी असे ठरविले, की जोपर्यंत या मुलीचे शिक्षण पूर्ण होत नाही तोपर्यंत ही रेल्वे बंद होणार नाही. तेव्हापासून केवळ एक प्रवासी असलेली ही ट्रेन धावत राहिली.

एवढ्यावर न थांबता जपान रेल्वेजने मुलीच्या शाळेच्या वेळेनुसार रेल्वेचे टाईम टेबल तयार केले. शाळेच्या वेळेनुसार ट्रेनची वेळ बदलत असायची. २०१६ मध्ये कानाहाराडाचे शिक्षण जेव्हा पूर्ण झाले आणि तेव्हापासून ही रेल्वेसेवा पूर्णपणे बंद करण्यात आली.

एखाद्या देशाच्या सरकारने केवळ एका मुलीच्या शिक्षणाची एवढ्या मोठ्या प्रमाणावर काळजी घ्यावी, ही गोष्ट खरोखर महान आहे. यासाठी जपानला मानाचा मुजरा...!!

**सक्सेस स्टोरी**

# टीना डाबी की बैचमेट, किसान की बेटी मीशा सिंह ने वकालत छोड़ तीसरे प्रयास में क्रैक की यूपीएससी, बनीं आयएएस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हम आपको एक ऐसी आयएएस अधिकारी से मिलवाने जा रहे हैं, जिन्होंने एलएल.बी. की पढ़ाई पूरी करने के बाद जज बनने का सपना देखा, लेकिन नियति ने उन्हें कलेक्टर बनाया। तीसरे प्रयास में यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में ६४ वीं रैंक हासिल कर मीशा सिंह ने आयएएस बनकर अपने सपने को साकार किया। आइए, जानते हैं उनकी सफलता की कहानी।

### १) कौन हैं आयएएस मीशा सिंह?

कई बार बचपन के सपने बदलते हैं, और उम्र के साथ नए लक्ष्य सामने आते हैं। मीशा सिंह ने शुरू में जज बनने का सपना देखा था, लेकिन सिविल सेवा की प्रतिष्ठा ने उन्हें इस दिशा में प्रेरित किया। उनकी मेहनत और दृढ़ संकल्प ने उन्हें आयएएस अधिकारी बनाया।

### २) किसान परिवार से ताल्लुक

मीशा सिंह उत्तर प्रदेश के एक गांव से हैं। उनके पिता आनंद सिंह एक किसान हैं, और मां विनोद कंवर गृहिणी हैं। साधारण परिवार से होने के बावजूद, उनके माता-पिता ने पढ़ाई में कोई कमी नहीं आने दी। इस समर्थन ने मीशा को बड़े सपने देखने की हिम्मत दी।

### ३) अवध यूनिवर्सिटी से एलएल.बी. की पढ़ाई

मीशा ने फैजाबाद (अयोध्या) के डॉ. राम मनोहर लोहिया अवध यूनिवर्सिटी से बी.ए. और एलएल.बी. (प्रशासनिक कानून) में पढ़ाई पूरी की। यहीं पढ़ाई के दौरान उन्हें सिविल सेवा की महत्ता का अहसास हुआ, और उन्होंने यूपीएससी की तैयारी शुरू कर दी।

### ४) दो बार असफलता, तीसरे प्रयास में सफलता

यूपीएससी का सफर मीशा के लिए आसान नहीं था। पहले दो प्रयासों में उन्हें असफलता मिली, लेकिन उन्होंने हार नहीं मानी। अपनी कमियों को सुधारते हुए, तीसरे प्रयास में उन्होंने २०१८ की यूपीएससी परीक्षा में ६४ वीं रैंक हासिल की और आयएएस बनने का सपना पूरा किया।

### ५) रतलाम की डीएम के रूप में कार्यरत

मीशा सिंह टीना डाबी की बैचमेट हैं। लाल बहादुर शास्त्री नेशनल अकादमी ऑफ एडमिनिस्ट्रेशन में ट्रेनिंग के बाद उन्हें मध्य प्रदेश कैडर आवंटित किया गया। वर्तमान में वे रतलाम की डिस्ट्रिक्ट मजिस्ट्रेट हैं। इससे पहले वे जबलपुर में अपर कलेक्टर के पद पर कार्यरत थीं।

### ६) प्रेरणा का स्रोत

मीशा सिंह की कहानी यह साबित करती है कि मेहनत, दृढ़ संकल्प और सही दिशा में प्रयास से कोई भी सपना असंभव नहीं है। एक किसान की बेटी से आयएएस अधिकारी बनने तक का उनका सफर लाखों युवाओं के लिए प्रेरणा है।



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# बोरी नदीवरील साडेसात कोटींचा पूल वापराविनाच!

## जागेच्या वादामुळे भुसंपादन प्रक्रिया रखडली; प्रवाशांमध्ये नाराजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– शहरातील बोरी नदीवरील गांधलीपुरा येथील पूल बांधून सात वर्षे उलटली आहेत. मात्र, अद्याप तो वाहतुकीसाठी बंदच आहे. पुलाच्या बाहेर पडण्यासाठी आवश्यक असलेली जमीन घेण्याची प्रक्रिया प्रलंबित आहे. ही जागा वक्फ बोर्डाची आहे की बोहरा समाजाची? याबाबतचा संभ्रम कायम असल्याने हा पूल साडेसात कोटी रुपये खर्चूनही अद्याप वापरात आलेला नाही. यामुळे हा पूल अजून वाऱ्यावरच आहे. याबाबत प्रवाशांसह नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गांधलीपुरा भागात राज्य मार्ग क्रमांक ६ दाखवून बोरी नदीवर साडेसात कोटी रुपयांचा पूल बांधण्यात आला होता. मात्र, या पुलावरून बाहेर पडण्यासाठीचा रस्ताच नसल्याने हा पूल गेली सात वर्षांपासून शो पीस ठरत आहे. २०१८ मध्ये पुलाचे काम पूर्ण झाले. मात्र, बाहेर पडताना बोहरा समाजाची जमीन अडथळा ठरत असल्याने वापर थांबल्याचे सांगण्यात येते. अखेर बोहरा समाजाने ही जमीन बांधकाम विभागाला देण्यास सहमती दर्शवली. २९२१ मध्ये पुलाचा जोडरस्ता तयार करण्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. हा मार्ग राज्य मार्ग १५ला जोडायचा होता. मात्र, नंतर ही जमीन बोहरा समाजाची नसून वक्फ बोर्डाची असल्याचा नवीन वाद उभा राहिला. त्यामुळे भूसंपादनाचा मोबदला कोणाला द्यायचा वक्फ बोर्डाला की बोहरा समाजाला? याबाबत अधिकारी संभ्रमात पडले आहेत. परिणामी, पुलाचा वापर अद्यापही सुरू होऊ शकलेला नाही.

**वाहतूक कोंडी कायम**

शहरात बोरी नदीवर अवघ्या १५० मीटर अंतरावर तीन पूल आहेत. त्यातील एका पुलाचे दोन्ही टोक रहिवासी वस्तीतून जातात. मोठी वाहने तिकडून जाऊ शकत नाहीत. त्यामुळे दगडी दरवाजाजवळ नेहमी वाहतूक कोंडी होते. संबंधित यंत्रणेने याकडे दुर्लक्ष केल्याची टीका नागरिकांमधून होत आहे.

**गांधलीपुरा पूल राज्य मार्ग १५ला जोडावा**

काही जाणकारांच्या मते बांधकाम विभागाने गांधलीपुरा पूल चुकीच्या ठिकाणी बांधल्याने तो गेली सात वर्षे वापराविना आहे. सध्या या पुलावर पाइपलाइन टाकण्यात आली आहे. जर या पुलाचा बाह्य रस्ता धुळेचोपडा राज्य मार्ग १५ ला जोडला, तर शहरातील वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणावर दूर होऊ शकते. ▲



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

> आम्ही भूसंपादनाचा प्रस्ताव पाठवला आहे. मात्र संबंधित जमिनीबाबत बोहरा समाजाने कोणतीही कागदपत्रे अद्याप दिलेली नाहीत, त्यामुळे ही भूसंपादन प्रक्रिया रखडली आहे.
> – **विजय गांगुर्डे,** उपविभागीय अभियंता

**भूसंपादन रखडलेलेच :**

सदर जागा नेमकी कुणाची आहे, याबाबतचा वाद अजून निकाली निघालेला नाही. शासनानेही यावर अद्याप निर्णय घेतलेला नसल्याने पूल बांधूनही तो निरुपयोगी ठरला आहे.

# उपकोषागार कार्यालय घाणीच्या विळख्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– तहसील कार्यालयाजवळ असलेल्या उपकोषागार कार्यालयासमोर कचऱ्याचे ढिगच ढिग लागलेले आहेत. अनेक प्रशासकीय कार्यालय असूनही स्वच्छतेचा अभाव असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. ही कार्यालये घाणीच्या विळख्यातून मुक्त करण्याची गरज आहे.

कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. सोमवार, दि. ३ रोजी दुपारी कार्यालयाच्या अगदी मुख्य प्रवेशद्वारासमोरच कचऱ्याचे ढिगारे, सडलेली पाने, प्लास्टिक कचरा आणि इतर घाण साचल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या ठिकाणी साचलेला कचरा केवळ टाकूनच ठेवला जात नाही, तर अनेकदा पेटवून जाळण्यात येतो. त्यामुळे परिसरात प्रदूषणासोबतच दुर्गंधी पसरते. नागरिकांच्या आरोग्य धोक्यात आलेआहे. सरकारी कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांना अशा अस्वच्छ आणि प्रदूषित वातावरणातून वावरावे लागते. "स्वच्छ भारत अभियान" राबवले जात असताना, दुसरीकडे शासकीय इमारतींसमोरच असा कचऱ्याचा खच उघड्यावर पडलेला आहे. ▲



(छायाचित्र : योगेश महाजन)

# सोने ९,१००, चांदी १३ हजार रुपयांनी स्वस्त

## ग्राहकांसह व्यावसायिकांना मिळाला मोठा दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



सुवर्ण बाजारपेठेत दिवाळीच्या काळात सोने आणि चांदीच्या दरात मोठी तेजी पाहावयास मिळाली होती. मात्र त्यानंतर कमी–अधिक फरकाने सातत्याने चढ–उतार सुरूच असल्याने सोने आता ९ हजार १००, तर चांदी १३ हजार रुपयांनी स्वस्त झाली आहे. यामुळे ग्राहकांसह व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या आठवड्यापासून सुवर्ण बाजारपेठेत जास्त करून चढ–उताराचे वातावरण पाहावयास मिळाले. काही दिवस सोन्याच्या दरात तेजी दिसून आली, तर काही दिवस घसरण झाली. आंतरराष्ट्रीय बाजारातील स्थिती, डॉलरच्या मूल्यातील बदल आणि गुंतवणूकदारांच्या हालचाली यांचा एकत्रित परिणाम सोन्याच्या दरावर झालेला आहे. आठवडाभरापासून सोन्याचे दर घसरले असले, तरी घसरण मर्यादित स्वरूपाची राहिली आहे. म्हणजेच सोन्याच्या दरातील घसरणीचा वेग आता कमी झाल्याचे दिसून येत आहे. मल्टी कमोडिटी एक्स्चेंज तसेच देशांतर्गत बाजारपेठेतही सोन्याचे दर मागील आठवड्याच्या तुलनेत थोडे कमी झाले आहेत. सध्या बाजारात स्थैर्याची चिन्हे दिसत असली, तरी आगामी काळात जागतिक आर्थिक घडामोडी, डॉलर–रुपया विनिमय दर आणि सणासुदीच्या मागणीवर सोन्याच्या दराचा कल अवलंबून राहील, असे तज्ज्ञांचे मत आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून सोने आणि चांदी यांच्या दरामध्ये विशेष दखल घेण्यासारखी हालचाल दिसून आलेली नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात किरकोळ चढ–उतार असूनही देशांतर्गत बाजारपेठेत दर जवळपास स्थिर राहिले आहेत. धनत्रयोदशी–लक्ष्मीपूजनानंतर झालेली दरातील घसरण सोने व चांदी यांचे दर थोडे स्थिरतेकडे झुकले आहेत. लग्नसराईचा हंगाम सुरू होत असल्याने गुंतवणूकदार आणि ग्राहक दोघेही बाजारातील हालचालींकडे बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

तज्ज्ञांच्या मते– जागतिक आर्थिक परिस्थिती पाहता भविष्यात सोने–चांदीच्या दरामध्ये मोठी तेजी किंवा घसरण होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे खरेदीदारांसाठी हा काळ तुलनेने अनुकूल ठरू शकतो. खरेदी किंवा गुंतवणुकीचा निर्णय घेताना बाजारातील हालचालींवर सतत लक्ष ठेवणे फायदेशीर ठरेल.

जळगावातील सुवर्ण बाजारपेठेत लक्ष्मीपूजनाच्या दिवशी २४ कॅरेट सोन्याचा दर जीएसटीसह एक लाख ३२ हजार ८७० रुपयांपर्यंत पोहोचले होते. त्यानंतर घसरण सुरूच राहिल्याने बुधवार, दि. ५ नोव्हेंबरपर्यंत सोन्याचे दर तीन टक्के जीएसटीसह एक लाख २३ हजार ७०३ रुपयांपर्यंत घसरले. सोन्याच्या दरात जवळपास ९,१६७ रुपयांची घट नोंदविली गेली. अशाच प्रकारे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी चांदीचे दर जीएसटीसह प्रतिकिलो एक लाख ६९ हजार ९५० रुपयांपर्यंत पोहोचले होते. त्यानंतर घसरण सुरूच राहिल्याने बुधवारपर्यंत चांदीचे दर तीन टक्के जीएसटीसह एक लाख ५६ हजार ५६० रुपयांपर्यंत घसरले. सुमारे १३ हजार ३९० रुपयांची घट नोंदविली गेली. ▲



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# प्रा. डॉ. शशिकांत पाटील यांना ब्रिटनच्या आयईटीची फेलोशिप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर तालुक्यातील मुडी येथील रहिवाशी आणि ॲटलस स्किलटेक विद्यापीठ (मुंबई) येथील तंत्रज्ञान ज्ञानशाखेचे संचालक व वरिष्ठ प्राध्यापक डॉ. शशिकांत पाटील यांना इंस्टिट्यूशन ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी (युके) यांची प्रतिष्ठित फेलोशिप प्रदान करण्यात आले आहे. दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांना सन्मानित करण्यात आले.

**फेलोशिपचे महत्त्व**

आयईटी फेलोशिप ही जागतिक स्तरावरील अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वोच्च मानली जो. १८७१ मध्ये स्थापन झालेल्या आणि १९२१ मध्ये रॉयल चार्टरद्वारे मान्यता मिळालेल्या या संस्थेचे फेलो सदस्यत्व मिळवणे अत्यंत कठीण आहे. यासाठी अत्यंत कडक नियम आणि निकष आहेत. त्यामुळे भारतात आणि जगभरात फक्त काही निवडक अभिजात अभियंते आणि शैक्षणिक तज्ज्ञांनाच हा सन्मान मिळतो. विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातील फार कमी व्यक्तींना ही फेलोशिप प्राप्त होते.

**आव्हानांवर मात**

डॉ. पाटील यांनी सांगितले की, २०२० मध्ये मी पहिल्यांदा या फेलोशिपसाठी अर्ज केला होता. तो नाकारण्यात आला होता. मात्र, ॲटलस स्किलटेक विद्यापीठाच्या कुलपती आणि संस्थापक अध्यक्ष डॉ. इंदु शहाणी यांच्या अनुमोदन पत्रामुळे आणि त्यांच्या प्रोत्साहनामुळे मी पुन्हा प्रयत्न केला आणि यशस्वी झालो. संस्थापक अध्यक्ष तथा कुलपती डॉ. इंदु शहाणी, कार्यकारी अध्यक्ष सिद्धार्थ शहाणी, व्हा. चान्सलर प्रा. हिना ठक्कर, कुलगुरू, रजिस्ट्रार आणि मानव संसाधन संचालक यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. ▲

# 'व्हॉईस ऑफ मीडिया'तर्फे आंतरराष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर

## श्रीकृष्ण चांडक, उत्तम कांबळे, विजय बाविस्कर, मृणालिनी नानिवडेकर, रवींद्र आंबेकर, विशाल पाटील पुरस्काराचे मानकरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



श्रीकृष्ण चांडक | उत्तम कांबळे | विजय बाविस्कर | मृणालिनी नानिवडेकर | रवींद्र आंबेकर | विशाल पाटील

'व्हॉईस ऑफ मीडिया', 'व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम' या आंतरराष्ट्रीय संघटनेतर्फे देण्यात येणारे 'व्हॉईस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार २०२५' जाहीर झाले आहेत. या वर्षी या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्र राज्यातील सहा नामांकित पत्रकारांचा समावेश आहे. येत्या १५ व १६ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथील इस्कॉनच्या 'भुवैकुंठ प्रकल्पा'मध्ये होणाऱ्या राज्य शिखर अधिवेशनामध्ये मान्यवरांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. मुंबई येथे झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये संघटनेचे संस्थापक, आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के आणि सोलापूर जिल्हाध्यक्ष बालाजी फुगारे यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. गेल्या पाच वर्षांपासून 'व्हॉईस ऑफ मीडिया', 'व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम' या संघटनेच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार आणि संपादकांना त्यांच्या आयुष्यभराच्या उल्लेखनीय पत्रकारितेतील योगदानाबद्दल सन्मानित करण्याची परंपरा आहे. यावर्षी या पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार, लेखक तसेच दैनिक महासागर माध्यम समूहाचे प्रमुख श्रीकृष्ण चांडक, ज्येष्ठ संपादक, लेखक आणि विचारवंत उत्तम कांबळे, लोकमत समूहाचे संपादक, विचारवंत विजय बाविस्कर, पुढारीच्या मल्टिमीडिया संपादक मृणालिनी नानिवडेकर, ज्येष्ठ पत्रकार, मॅक्स महाराष्ट्रचे संपादक प्रमुख रवींद्र आंबेकर आणि लोकशाही मराठी न्यूज चॅनलचे संपादक विशाल पाटील यांची निवड करण्यात आली आहे. पंढरपूर येथे पार पडणाऱ्या अधिवेशनामध्ये देशभरातील पत्रकार, संपादक, लेखक, विचारवंत तसेच सांस्कृतिक आणि सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पत्रकारितेतील नव्या प्रवाहांवर विविध सत्रे आणि चर्चा देखील आयोजित करण्यात येणार आहेत. 'व्हॉईस ऑफ मीडिया', 'व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम'चे कार्याध्यक्ष संजय आवटे, राष्ट्रीय सरचिटणीस चंद्रमोहन पुपाला, राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले, प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले, कोषाध्यक्ष चेतन बंडेवार, संघटक अशोक वानखडे, अश्विनी डोके–सातव, परवेज खान, कार्यवाहक शंतनू डोईफोडे, संचालक संयोजक शिवाजी गावंडे, व्यंकटेश जोशी, गोरक्षनाथ मदने, किशोर कारंजेकर, आंतरराष्ट्रीय प्रमुख गगन महोत्रा, आरोग्य विंगचे प्रमुख भीमेश मुतुला यांनी सर्व पुरस्कार्थींना शुभेच्छा दिल्या. ▲

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

**जाहिरात बुकिंगसाठी संपर्क**

शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# मंगळवारचा सोपा तोडगा

अशी मान्यता आहे, की मंगळवारी खालील उपाय केल्यास आयुष्यातील संकटे टळू शकतात. माणसाच्या आयुष्यात समस्या असणे, ही साधारण गोष्ट आहे. पण अनेकदा उपाय करूनही समस्या, अडचणी दूर होत नसतील तर टेन्शन येते. अशा वेळी अनेकांना संकटमोचन हनुमानजी आठवतात. शास्त्र सांगते, की दर मंगळवारी हनुमानजींची पूजा केल्यास सर्व संकटे दूर होतात. कारण मंगळवार हा हनुमानजींना समर्पित वार आहे. हनुमानजींना तुळशीची पाने खूप प्रिय आहेत. त्यामुळे दर मंगळवारी हनुमानजींना तुळशीची पाने अर्पण करावीत. हनुमानजींना सिंदूर म्हणजेच शेंदूर व नारळ अर्पण करणे शुभ मानले जाते.

खरे तर हनुमान चालिसाचे नियमित पठण केले पाहिजे. नाहीच जमले तर किमान मंगळवारी हनुमान चालिसाचे पठण जरूर करावे. **‘ ओम अं अंगारकाय नम:’** मंत्राचा मंगळवारी जप करावा. मंगळवारी हनुमानजींना ११ पिंपळाची पाने अर्पण करावीत. मंगळवारी मोहरी किंवा चमेलीच्या तेलाचा दिवा हनुमानासमोर लावावा.

## लग्न जुळण्यासाठी उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

धर्म शास्त्रात लग्न जुळण्यासाठी काही उपाय सांगितले आहेत. जसे की दररोज सकाळी भगवान शिव आणि माता पार्वती यांची पूजा करणे.

**‘ क्लीं कृष्णाय गोविंदाय गोपीजनवल्लभाय स्वाहा ’**

या मंत्राचा जप करणे. गुरुवारी हळद टाकून स्नान करणे. या उपायांव्यतिरिक्त लग्न लवकर होण्यासाठी काही ज्योतिषीय उपाय देखील केले जातात.

### आध्यात्मिक आणि ज्योतिषीय उपाय

दररोज सकाळी स्नान करून भगवान शिव आणि माता पार्वती यांची पूजा करावी. ‘ पार्वती चालिसा ’चा पाठ करावा. असे म्हणतात, की यामुळे लवकर विवाह होण्याची शक्यता वाढते.

**मंत्राचा जप : ‘ क्लीं कृष्णाय गोविंदाय गोपीजनवल्लभाय स्वाहा ’**

या मंत्राचा १०८ वेळा जप केल्याने अविवाहित व्यक्तीचा लवकर विवाह होऊ शकतो.

### गुरुवारी विशेष उपाय

दर गुरुवारी पाण्यात हळद टाकून स्नान करावे. गंगाजलात हळद टाकून अर्धे पाणी केळीवर आणि अर्धे पिंपळाच्या झाडावर अर्पण करावे. दर गुरुवारी भगवान विष्णू यांच्या मंदिराची स्वच्छता करावी.

### तुळशीची पूजा

तुळशीची पूजा करणे देखील एक प्रभावी उपाय मानला जातो.

### शनिवारी उपाय

लग्नात अडथळे येत असतील, तर दर शनिवारी तुळशीच्या पानांचा उपाय करावा. मुलगी असल्यास तिच्यावरून तुरटी ओवाळून विस्तवावर टाकावी. असे तीन शनिवार केल्यास लग्नातील अडथळे दूर होतात, असे मानले जाते.



# आपल्या गोत्राची खरी शक्ती माहिती आहे का ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गोत्र हे केवळ एक विधी नाही. अंधश्रद्धा तर मुळीच नाही. हे आहे तुमचे प्राचीन सांकेतिक वारसत्व. एक आत्मिक कोड. असे समजा की तुमचा भूतकाळच त्यावर अवलंबून आहे.

**१) गोत्र म्हणजे तुमचे आडनाव नव्हे, तर आध्यात्मिक डीएनए**

बहुतेकजण आपल्या गोत्राबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ आहेत. आपला समज असा आहे, की पूजेमध्ये पुजारी जे काही म्हणतो त्याचा तो भाग आहे. पण ते तितकेच नाही. गोत्र म्हणजे तुम्ही कोणत्या ऋषींच्या मनोवृत्तीशी जोडलेले आहात. हे रक्ताने नव्हे, तर विचारांनी, ऊर्जेने, कंपनांनी आणि ज्ञानधारेने जोडलेले असते. प्रत्येक हिंदूचा आत्मिक स्रोत एखाद्या ऋषीकडे जातो. तो ऋषी म्हणजे तुमचा बौद्धिक पूर्वज. त्याचे ज्ञान, मनोस्वभाव, अंतर्गत ऊर्जा हे सगळे तुमच्यात वाहत असते.



**२) गोत्र म्हणजे जात नव्हे**

आज बरेच लोक गोत्र आणि जात एकत्र करून पाहतात. मात्र गोत्र हे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र याचे प्रतीक नाही. ते जातप्रथा, आडनावे आणि राज्ये उदयास येण्यापूर्वीच अस्तित्वात होते. गोत्र म्हणजे ज्ञानाधारित ओळखसत्ताधारित नव्हे. ज्यांनी ऋषींचे शिक्षण प्रामाणिकपणे आत्मसात केले त्यांनाही ऋषी गोत्र देत असत. हे कमावलेले असते. जन्मसिद्ध नव्हे. गोत्र हे तुमच्या आध्यात्मिक परंपरेचा एक शिक्का आहे.

**३) गोत्र एखाद्या ऋषीकडून उगम पावलेले असते**

उदा.- तुम्ही वसिष्ठ गोत्रातील असाल, तर तुम्ही त्या वसिष्ठ ऋषींच्या परंपरेतील आहात. ज्यांनी प्रभू श्रीरामचंद्र आणि दशरथ राजाला मार्गदर्शन केले. भरद्वाज गोत्रातील असाल, तर तुम्ही त्या ऋषींच्या वंशातील आहात. ज्यांनी वेदांचे अंश लिहिले, योद्धे आणि पंडित घडवले. प्रमुख ४९ गोत्रे आहेत. प्रत्येक ऋषी वैज्ञानिक, योद्धा, मंत्रद्रष्टा, वैद्य किंवा खगोलतज्ज्ञ होते.

**४) एकाच गोत्रातील विवाहास वडिलधाऱ्यांकडून मनाई का?**

प्राचीन भारतात गोत्राचा वापर जनुकीय ओळख राखण्यासाठी होत असे. गोत्र पुरुषवर्गातून पुढे जाते म्हणजे मुलगा ऋषीवंश पुढे नेतो. एकाच गोत्रात विवाह केला, तर दोघेही अनुवांशिकदृष्ट्या खूप जवळचे म्हणजे बहीण-भावासारखे असतात. यामुळे संततीमध्ये मानसिक व शारीरिक दोष होऊ शकतात. गोत्रपद्धती म्हणजे प्राचीन भारतीय जनुकीय शास्त्र. आपण हे हजारो वर्षांपूर्वीच ओळखले होते. जे पाश्चात्य शास्त्राने अलीकडेच शोधले.

**५) गोत्र म्हणजे मानसिक संप्रेषण**

काही लोक जन्मतःच विचारवंत असतात. काहींच्या आत्म्यात आध्यात्मिक तहान असते. काहींना निसर्गात शांतता वाटते. काही स्वाभाविक नेते असतात. का? कारण तुमच्या गोत्रातील ऋषींचे मन अजूनही तुमचे अंतरंग घडवत असते. तो ऋषी जसा विचार करत होता, जसे अनुभवत होता, जसा प्रार्थना करत होता तसेच काहीसे तुमच्या विचारांमध्ये झळकत असते. ही जादू नाही. ही आहे डीप कोडिंग.

**६) गोत्राचा उपयोग शिक्षणपद्धती ठरविण्यासाठी...**

प्राचीन गुरुकुलात प्रत्येकाला एकसारखे शिकविले जात नसे. गुरू पहिलाच प्रश्न विचारत : “ बाळा, तुझे गोत्र काय?” हे का विचारायचे? कारण त्यातून समजायचे की कोणत्या प्रकारचे ज्ञान त्या विद्यार्थ्यास योग्य आहे. कोणते मंत्र त्याच्या ऊर्जेला सुसंगत आहेत. उदा.- अत्री गोत्राचा विद्यार्थी ध्यान आणि मंत्रविद्येत पारंगत होतो. कश्यप गोत्राचा विद्यार्थी आयुर्वेदात गूढ प्रवेश करतो. गोत्र म्हणजे शिक्षणशैली, जीवनमार्ग आणि आत्मस्वरूप.

**७) ब्रिटिशांनी याची थट्टा केल्याने आपण विसरलो**

जेव्हा ब्रिटिश भारतात आले तेव्हा त्यांनी गोत्रपद्धतीला अंधश्रद्धा म्हणून हिणवले. बॉलीवूडने पुजाऱ्यांच्या गोत्र विचारण्याची चेष्टा केली आणि हळूहळू आपण आपल्या आजी-आजोबांना विचारणे थांबविले, आपल्या मुलांना सांगणे बंद केले. दहा हजार वर्षांची परंपरा फक्त शंभर वर्षांत हरवली. कोणी नष्ट केली नाही. आपणच विसरलो.

**८) गोत्र माहीत नसेल तर तुम्ही एक नकाशा गमावला**

कल्पना करा, की तुम्ही एखाद्या प्राचीन राजघराण्यातील आहात. पण तुमचे आडनाव काय आहे हेच माहीत नाही. तसेच आहे गोत्राचे महत्त्व. गोत्र म्हणजे तुमचे आध्यात्मिक जीपीएस. जे तुम्हाला योग्य मंत्र, विधी, ऊर्जा, उपचार, वैयक्तिक साधना आणि विवाहासाठी योग्य जोड मिळविण्यासाठी मार्ग दाखविते. गोत्राशिवाय आपण धर्माच्या वाटेवर अंधारात चालणारे होतो.

**९) गोत्र सांगणे हे ‘ फक्त औपचारिकता ’ नव्हते**

पूजेमध्ये पंडित जेव्हा तुमचे गोत्र उच्चारतो तेव्हा तो केवळ एक विधी करत नसतो. तो तुम्हाला तुमच्या ऋषिपरंपरेशी पुन्हा जोडत असतो. तुमच्या आत्मिक वंशपरंपरेला साक्षी म्हणून बोलावतो आणि आशीर्वादाची वाट मोकळी करतो. म्हणूनच संकल्पात गोत्र सांगणे हे अत्यंत पवित्र विधान असते. “ मी, भरद्वाज ऋषींचा वंशज, पूर्ण आत्मचेतनेने देवतांचे साहाय्य मागतो.”

**१०) तुमचे गोत्र जतन करा उशीर होण्याआधी**

आई-वडिलांना, आजी-आजोबांना विचारा. माहिती नसेल, तर शोधा. पण ते माहीत नसणे म्हणजे आपली मूळे विसरणे. ते लिहून ठेवा, मुलांना सांगा आणि अभिमानाने उच्चारा. तुम्ही २००० मध्ये जन्मलेले असाल तरी तुमचे गोत्र हजारो वर्षांपूर्वीच्या ऋषीने पेटविलेली दिव्य ज्योत आहे. तुम्ही त्या अजरामर कथेचे आत्ताचे शेवटचे पान आहात.

**११) तुमचे गोत्र म्हणजे आत्म्याचे विसरलेले पासवर्ड**

आज आपण वाय-फाय पासवर्ड, ई-मेल लॉगिन, नेटफ्लिक्स कोड लक्षात ठेवतो. पण सगळ्यात जुना पासवर्ड आपले गोत्र विसरतो. तो एकच शब्द तुमचे पूर्वजांचे ज्ञान, मानसिक सवयी, कर्माचे संस्कार आणि आत्मिक बल उघडू शकतो. हे फक्त एक लेबल नाही, तर ही एक किल्ली आहे. ती वापरा नाही तर गमवा.

**१२) स्त्रिया विवाहानंतर गोत्र ‘ गमावत ’ नाहीत**

अनेकांना वाटते, की लग्नानंतर स्त्रियांचे गोत्र बदलते. मात्र सनातन धर्म अतिशय सूक्ष्म आहे. श्राद्ध विधीत स्त्रीचे गोत्र वडिलांकडून घेतले जाते. कारण गोत्र वाय-क्रोमोसोमने पुरुषवाटे पुढे जाते. स्त्रिया गोत्राची ऊर्जा वाहक असतात. पण ते आनुवंशिकदृष्ट्या पुढे नेत नाहीत. म्हणून स्त्रीचे गोत्र लग्नानंतरही तिच्या अस्तित्वात जीवंत असते.

**१३) देवांनी सुद्धा गोत्र नियम पाळले**

रामायणात जेव्हा प्रभू श्रीरामचंद्र आणि माता सीता यांचे लग्न झाले तेव्हा त्यांचे गोत्र तपासले गेले.

**प्रभू श्रीरामचंद्र :** इक्ष्वाकु वंश. वसिष्ठ गोत्र.

**माता सीता :** जनक राजा यांची कन्या. कश्यप गोत्र.

प्रेमाखातर त्यांनी धर्माचे नियम झुगारले नाहीत. देवसुद्धा गोत्रसंहिता पाळत होते, हे याचे महत्त्व सिद्ध करते.

**१४) गोत्र अन् प्रारब्ध कर्म यांचा संबंध आहे**

कधी असे वाटते, का की लहानपणापासून तुम्ही काही विशिष्ट गोष्टींमध्ये आकर्षित होता? ते प्रारब्ध कर्म असते. या जन्मात फळ देणारी कर्मबीजे. प्रत्येक ऋषींच्या कर्मधारा वेगळ्या होत्या. तुम्ही त्यांच्या गोत्रात असल्यामुळे ती कर्मसंस्कृती तुमच्यावरही असते. गोत्र समजणे म्हणजे तुमचे कर्ममार्ग जाणून घेण्याची गुरुकिल्ली.

**१५) प्रत्येक गोत्राशी विशिष्ट देवता आणि बीजमंत्र जोडलेले असतात**

गोत्र म्हणजे केवळ मनोवृत्ती नव्हे. ते विशिष्ट देवता आणि बीजमंत्रांशी सुसंगत असते. कधी वाटते का की एखादा मंत्र “ काम करत ” नाही? कदाचित तुम्ही तुमच्या आत्मिक ऊर्जेला सुसंगत मंत्र वापरत नाही. योग्य गोत्र + योग्य मंत्र = आध्यात्मिक प्रवाह. हे समजल्यास ध्यान, साधना आणि उपचारशक्ती १० पटींनी वाढते.

**१६) गोत्र = अंत:प्रेरणा गोंधळात**

आज बरेच लोक हरवलेले वाटतात. उद्दिष्ट काय? जीवनमार्ग कोणता? नातेसंबंध कसे असावेत? पण जर तुम्ही शांत बसलात आणि तुमचे गोत्र, ऋषी, परंपरा यांचा विचार केला, तर अंत:प्रेरणा जागृत होते. तुमचा ऋषी गोंधळात नव्हता. त्याची विचारलहर अजूनही तुमच्या नसानसांत आहे. तिला अनुसरले, तर स्पष्टता मिळते.

१७) प्रत्येक थोर हिंदू सम्राटाकडून गोत्राचा सन्मान

चंद्रगुप्त मौर्य, हर्षवर्धन, शिवाजी महाराज या सगळ्यांनी राजगुरू नेमले. जे कूल, गोत्र आणि परंपरा यांची नोंद ठेवत. राजकीय आणि सामाजिक निर्णय घ्यायचाही आधार गोत्रावर असायचा. गोत्र म्हणजे केवळ एक ओळख नव्हे. ती संस्कृतीची शिरा आहे. तिला दुर्लक्ष करणे म्हणजे आपल्या मुळालाच नाकारणे.

**१८) गोत्र पद्धतीने स्त्रियांना संरक्षण दिले**

आधुनिक भाषेत बोलायचे झाले, तर गोत्र ट्रॅकिंग ही एक सुरक्षाव्यवस्था होती. ती पिढीतील विवाह टाळण्यासाठी, रक्तसंबंध जपण्यासाठी आणि स्त्रियांच्या सन्मानासाठी होती. युद्धात हरवलेल्या किंवा अपहृत स्त्रियांनाही त्यांच्या गोत्रामुळे पुन्हा समाजात स्थान मिळविता आले. ही मागासपणा नव्हे, तर ही पुरातन बुद्धिमत्ता होती.

**१९) गोत्र म्हणजे तुमची कॉस्मिक भूमिका**

प्रत्येक ऋषी ब्रह्मांडासाठी एका विशिष्ट कार्यासाठी झटत होता. काही शरीरोपचारात पारंगत होते. काही खगोलशास्त्रज्ञ होते. काही धर्मरक्षक होते. काही न्यायसंस्थापक होते. तुमचे गोत्र त्या उद्देशाचे पडसाद घेऊन येते. तुम्हाला आयुष्यात रिकामेपण जाणवते? कदाचित तुम्ही तुमची ब्रह्मांडीय भूमिका विसरलात. गोत्र शोधा. भूमिका सापडेल.

**२०) हे धर्माबद्दल नाही, ही ओळखीबद्दल आहे**

तुम्ही नास्तिक असाल, फक्त आध्यात्मिक असाल, विधी-धर्मांबद्दल गोंधळलेले असाल तरीही गोत्र महत्त्वाचे आहे. कारण हे धर्माच्या पलीकडचे आहे. हे आहे पूर्वजांचे भान. हे आहे भारतीय तत्त्वज्ञानाचे मौन मार्गदर्शन. त्यावर विश्वास ठेवणे गरजेचे नाही. मात्र ते आठवणे गरजेचे आहे.

**अंतिम शब्द**

तुमचे नाव आधुनिक असू शकते. तुमची जीवनशैली जागतिक असू शकते. पण तुमचे गोत्र कालातीत आहे. जर तुम्ही त्याकडे दुर्लक्ष केले, तर तुम्ही त्या नदीसारखे आहात जी आपला उगम विसरलेली आहे. गोत्र म्हणजे भूतकाळ नव्हे, ते भविष्यातील ज्ञानाचे पासवर्ड आहे. ते उघडा आणि पुढच्या पिढीला ते हरवू देऊ नका.

# शंखनादाचे धार्मिक व वैद्यकीय महत्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



‘ देवळात महादेवाची पूजा करताना शंखपूजा उक्त नाही. मात्र आरतीपूर्वी शंखनाद विहित आहे आणि अवश्य केला जातो. ’ शास्त्र : शंखनादाने प्राणायामाचा अभ्यास तर होतोच. शिवाय शंखनाद जेथपर्यंत ऐकू जातो त्या परिसरात भूत, पिशाच वगैरे वाईट शक्तींचा त्रास होत नाही. वैद्यकीयदृष्ट्या शंखनादाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

### दक्षिणावर्ती शंख

तंत्र क्रियांमध्ये शंख उपयोगात आणला जातो. तंत्रशास्त्रामध्ये दक्षिणावर्ती शंखाला विशेष महत्त्व आहे. या शंखाची विधीवत पूजा करून घरामध्ये स्थापना केल्यास विविध प्रकारच्या बाधा नष्ट होतात. धनाची कमतरता भासत नाही. दक्षिणावर्ती शंखाचे अनेक लाभ आहेत. परंतु हा शंख घरामध्ये ठेवण्यापूर्वी याचे शुद्धीकरण करणे आवश्यक आहे.

### दक्षिणावर्ती शंखाचे शुद्धीकरण

लाल वस्त्रावर दक्षिणावर्ती शंख ठेवून त्यामध्ये गंगाजल (गंगेचे पाणी) भरावे आणि आसनावर बसून खालील मंत्राचा जप करावा.

ऊँ श्री लक्ष्मी सहोदराय नमः या मंत्राचा कमीत कमी पाच माळ जप करावा आणि त्यानंतर शंख देवघरात ठेवावा. दक्षिणावर्ती शंख धान्य भांडारमध्ये ठेवल्याने धान्य, धन भांडारमध्ये ठेवल्याने धन, वस्त्र भांडारमध्ये ठेवल्याने वस्त्रांची कमतरता भासत नाही. शयन कक्षामध्ये (झोपण्याच्या खोलीत) ठेवल्यास शांततेचा अनुभव होतो. यामध्ये शुद्ध, पवित्र पाणी भरून व्यक्ती, वस्तूवर शिंपडल्याने दुर्भाग्य, अभिशाप, तंत्र-मंत्र इत्यादींचा प्रभाव समाप्त होतो. कोणत्याही प्रकारचे वाईट तांत्रिक प्रयोग या शंखाच्या प्रभावासमोर निष्फळ होतात. दक्षिणावर्ती शंख असलेल्या ठिकाणी धनाची कमतरता राहत नाही. दक्षिणावर्ती शंख घरामध्ये ठेवल्याने सर्व प्रकारची नकारात्मक ऊर्जा स्वतः नष्ट होते आणि सकारात्मक ऊर्जा वाढते.


